मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये अर्ली डिटेक्शन सिस्टीम सुरु

## महापालिकेकडून "पर्जन्यमान व पूर अंदाज-पुर्वसूचना प्रणाली" कार्यान्वित

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कम्प्युटिंग (C-DAC), पुणे यांच्या सहकार्याने प्रगत "पर्जन्यमान व पूर अंदाज – पुर्वसूचना प्रणाली (अर्ली डिटेक्शन सिस्टीम)" कार्यान्वित करण्यात आली आहे.

या उपक्रमाचा उद्देश हवामान, वायू गुणवत्ता आणि पूर यांचे अचूक भाकीत करून आपत्ती व्यवस्थापन आणि धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत गती आणून प्रभावी उपाययोजना राबविणे हा आहे.

ही प्रणाली भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या (MEITY) राष्ट्रीय सुपरकॉम्प्युटिंग मिशन (NSM) अंतर्गत विकसित करण्यात आली आहे. या योजनेचा भाग म्हणून, C-DAC पुणे येथील उच्च कार्यक्षमता संगणन (HPC) गटाने भारतीय शहरांसाठी शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या विविध पर्यावरणीय समस्यांचा ( पावसाचे प्रमाण, पूर, वायू प्रदूषण, उष्णतेच्या लाटा) अभ्यास करून त्यांचे संगणकीय मॉडेल तयार केले आहे. या संदर्भात, मल्टि-सेक्टोरियल सिम्युलेशन लॅबची उभारणी केली गेली असून हवामान, जलव्यवस्थापन, आरोग्य, वाहतूक इत्यादी विविध क्षेत्रांमधील घटक एकत्रितपणे समाविष्ट केले गेले आहेत आणि आभासी प्रयोगांद्वारे त्यांच्या परिणामांवर अभ्यास केला जात आहे.

त्याचबरोबर, प्रयोगशाळेच्या मदतीने एक विज्ञानाधिष्ठित निर्णय सहाय्यक आराखडा विकसित केला जात असून यामुळे शहर प्रशासनाला धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मदत होणार आहे. या पद्धतीच्या माध्यमातून पाऊस, पूर, वायू प्रदूषण यांसारख्या शहरी पर्यावरणीय समस्या ओळखता येतात आणि त्यावर वेळेवर उपाययोजना आखता येतात, ज्यामुळे आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे हाताळता येते.




> आपत्तीपूर्व तयारी ही सुरक्षित शहराच्या बांधणीसाठी अत्यावश्यक आहे. C-DAC च्या सहकार्याने विकसित केलेली प्रगत हवामान व पूर पूर्वसूचना प्रणाली पिंपरी चिंचवड शहराला अधिक सक्षम, जागरूक आणि आपत्ती निवारणास सज्ज बनवेल. या प्रणालीच्या मदतीने धोरणनिर्मितीपासून नागरिकांच्या सुरक्षेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर परिणामकारक निर्णय घेता येणार आहेत.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

### प्रणालीची ठळक वैशिष्ट्ये -

- प्रणालीच्या माध्यमातून ७२ तासांपूर्वीच भाकीत
- हवामान, जलविज्ञान, वायू गुणवत्ता समावेश
- स्वयंचलित पडताळणी व मूल्यांकन प्रणाली
- धोरणकर्ते आणि नागरिकांना सुलभ माहिती
- स्थानिक पातळीवर त्वरित निर्णयासाठी मदत
- आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम व परिणामकारक

# पिंपरी-चिंचवडमध्ये आता 'मेडीसिटी' प्रकल्पाच्या हालचाली!

## वैद्यकीय सेवा, संशोधन क्षेत्रात शहराची नवी ओळख : मुख्यमंत्री फडणवीस यांना केली मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगनगरी, मेट्रो सिटी अशी ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये आता मेडीसिटी प्रकल्प विकसित करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे वैद्यकीय सेवा आणि संशोधन क्षेत्रातही शहराची लौकीक वाढणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आहे.

मेडीसिटी प्रकल्प विकासासाठी आमदार लांडगे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागणी केली आहे. त्यासाठी दिलेल्या पत्रामध्ये त्यांनी म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सध्या 30 लाखांच्या घरात आहे. शहराचे नागरीकरण आणि विस्तार मोठ्या प्रमाणात वाढत असून, 2045 मध्ये 50 लाखांहून अधिक लोकसंख्या असलेले शहर म्हणून पिंपरी-चिंचवड नावारुपाला येणार आहे.

पुणे जिल्ह्यातील उत्तर भागात खेड, आळंदी, मंचर, शिरुर, जुन्नर या भागातून पिंपरी-चिंचवडमध्ये नोकरी व व्यावसायाच्या निमित्ताने येणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षणीय आहे. मुंबई-पुणे जुना व नवीन महामार्ग आणि श्रीक्षेत्र देहू व आळंदी यांच्या मध्यावर असलेल्या पिंपरी-चिंचवडची पुणे-नगर, पुणे-नाशिक, पुणे-मुंबई अशी 'कनेक्टिव्हीटी' महत्त्वपूर्ण ठरते.

पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरण व राज्य सरकारच्या माध्यमातून 'रिंग रोड'ही प्रस्तावित आहे. या पार्श्वभूमीवर 'फ्युचर सिटी' पिंपरी-चिंचवडमध्ये मोशी येथील पीएमआरडीएच्या जागेत 'मेडिसिटी' प्रकल्प विकसित करावा. ज्यामुळे उत्तर पुणे जिल्ह्यात वैद्यकीय शिक्षण, संशोधन आणि उपचार सुविधा निर्माण होईल.



### मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे होणार बैठक...

मोशी येथील पीएमआरडीएच्या मध्यवर्ती जागेत 'फ्युचर सिटी' पिंपरी-चिंचवडसाठी 'मेडीसिटी प्रकल्प' विकसित करणे शक्य आहे. त्या अनुशंगाने पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरण आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक नियोजित करावी, अशी विनंतीही मुख्यमंत्री फडणवीस यांना केली आहे. दरम्यान, पीएमआरडीएच्या प्रशासकीय पातळीवर मेडीसिटीबाबत जागा निश्चितीकरीता सर्च मोहीम सुरू करण्यात येणार आहे. भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गाव मोशी आणि परिसरात अशी मेडीसिटी विकसित झाल्यास शहरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांसाठी मोठी सुविधा निर्माण होणार आहे.

# पुणेकरांनो पाणी जपून वापरा!

## अखेर शहरात पाणी कपातीला सुरुवात : दक्षिण पुण्याला रोटेशन पद्धतीने पाणीपुरवठा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेने शहराच्या दक्षिण भागात पाणीकपात करण्यास सुरुवात केली आहे. कात्रज, आंबेगावसह सिंहगड रस्त्यावरील धायरी, हिंगणे, वडगाव बुद्रुक, सन सिटी या परिसरापासून पाणीकपातीला सुरुवात करण्यात आली असून, या भागातील पाणीपुरवठा आता आठवड्यातून एक दिवस बंद ठेवला जाणार आहे.

कात्रज, कोंढवा, भारती विद्यापीठ या भागांमध्ये गेल्या दीड महिन्यापासून दर मंगळवारी पाणीपुरवठा बंद ठेवला जात होता. त्याबाबतचे वृत्त एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात 'लोकसत्ता'ने प्रसिद्धही केले होते. त्यावर आता महापालिका प्रशासनाने पाणीकपातीचे वेळापत्रक प्रसिद्ध करून शिक्कामोर्तब केले आहे.



वडगाव बुद्रुक पाणीपुरवठा केंद्रातून कात्रज, आंबेगाव, धायरी, तसेच सिंहगड रस्त्यावरील भागात पाणीपुरवठा केला जातो. मात्र, या भागासाठी उपलब्ध होणारे पाणी कमी पडत असल्याने कात्रज परिसरातील पाणीपुरवठा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाला आहे. याबाबतच्या अनेक तक्रारी पाणीपुरवठा विभागाकडे आल्या आहेत. या सर्व भागांमध्ये पुरेशा दाबाने पाणी देण्यासाठी आता आठवड्यातून एक दिवस वेगवेगळ्या भागांतील पाणी बंद ठेवले जाणार आहे. या निर्णयाची अंमलबजावणी येत्या सोमवारपासून (५ मे) केली जाणार आहे. या भागात चक्राकार पद्धतीने पाणी दिले जाणार आहे, असे पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितले.

### वार आणि पाणीपुरवठा बंद असणारा भाग

» सोमवार : बालाजीनगर, श्रीहरी सोसयाटी, गुरुदत्त सोसायटी, साईकृपा सोसायटी, पवार रुग्णालय, कात्रज परिसर, कोंढवा, साईनगर, शांतीनगर सोसायटी, महानंदा सोसायटी, श्रीकृष्ण कॉलनी.

» मंगळवार : संपूर्ण सन सिटी परिसर, माणिकबाग, समर्थ नगर, मधुकर हॉस्पिटल परिसर, विठ्ठलवाडी, जुनी धायरी, बारंगणी मळा, पारी कंपनी रस्ता, राजस सोसायटी कात्रज, निरंजन सोसायटी, कमला सिटी, कोंढवा खडी मशीन चौक, सिंहगड महाविद्यालय, हब टाउन सोसायटी, कोलते पाटील सोसायटी.

» बुधवार : वडगाव बुद्रुक, वडगाव हिंगणे, जाधवनगर, वडगाव गावठाण, जाधवनगर, हिंगणे, महादेवनगर, राजीव गांधी वसाहत, कात्रज वाघजाईनगर, सुखदा-वरदा सोसायटी, आंबामाता मंदिरामागील परिसर, सिल्व्हर ओक सोसायटी, सुखसागर नगर, स्वामी समर्थनगर.

» गुरुवार : धनकवडी गावठाण, बाळकृष्ण सोसायटी, सौदागर सोसायटी, राजमुद्रा सोसायटी, चित्तविहारी सोसायटी, अक्षयनगर, दौलतनगर, कलानगर, गुलाबनगर, चैतन्यनगर, तळजाई पठार, सन्मित्र सोसायटी, सागर सोसायटी, सहकारनगर भाग १, दाते बसस्टॉप, सुखसागरनगर भाग १, निलया सोसायटी, महादेवनगर भाग – २, कोंढवा, गोकुळनगर, वृंदावननगर.

» शुक्रवार : आंबेगाव पठार, दत्तनगर भुयारी मार्ग, त्रिमूर्ती चौक, भारती विद्यापीठ, जोगेश्वरीनगर, मोरे-निंबाळकर वस्ती, भारतनगर, दत्तनगर. आगम मंदिर संतोषनगर वंडर सिटी परिसर, साईनगर, कोंढवा बु. (गावठाण), कपिलनगर, लक्ष्मीनगर, आचल फार्म.

» शनिवार : कात्रज गाव, गुजरवाडी फाटा, अखिल नवीन वसाहत कात्रज, राजीव गांधी वसाहत, ग्रीन पार्क, अजमेरा पार्क.

» रविवार : कात्रज महादेवनगर भाग १, आनंदनगर, महावीर नगर, शिव प्लाझा पिसोळी रस्ता, पारगे नगर, आंबेडकरनगर, पुण्यधाम आश्रम रस्ता.

# संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे 19 जूनला प्रस्थान

## 17 दिवसांचा प्रवास करून 5 जुलैला पालखी सोहळा पंढरीत पोहचणार

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी पायीवारीसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे १९ जून रोजी आळंदी येथील मंदिरातून पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. प्रथा, परंपरेनुसार रात्री आठच्या सुमारास माऊलींच्या पालखीचे समाधी मंदिरातून प्रस्थान होईल. १७ दिवसांचा प्रवास करुन ५ जुलैला पालखी सोहळा पंढरीत पोहचणार आहे. याबाबतची माहिती माऊलींचे पालखी सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे यांनी दिली.

माऊलींच्या पालखीचा दर्शनबारी मंडपात (गांधीवाडा, आजोळी) पहिला मुक्काम असणार आहे. २० जून रोजी पालखी पुण्यात दाखल होईल. २० आणि २१ जून रोजी पालखी सोहळा पुण्यनगरीत मुक्कामी राहील. २२, २३ जूनला सासवड, २४ जूनला जेजुरी, २५ जूनला वाल्हेत पालखी मुक्कामी असेल. त्यानंतर नीरा स्नानानंतर २६ जूनला पालखी सोहळा लोणंद येथे मुक्कामी जाईल. यंदा लोणंदला एकच दिवस पालखी मुक्कामी असेल. त्यानंतर २७ जूनला चांदोबाचा लिंब येथे पहिले उभे रिंगण होईल. पालखी तरडगाव येथे मुक्कामी असणार आहे. २८ जूनला फलटण, २९ जूनला बरड, ३० जूनला नातेपुते, १ जुलैला पुरंदवडे येथे पहिले गोल रिंगण होईल. त्यानंतर पालखी माळशिरसला मुक्कामी जाईल. २ जुलैला सकाळचा विसावा असलेल्या खुडूस फाटा येथे दुसरे गोल रिंगण होईल. पालखी वेळापूर मुक्कामी जाईल. ३ जुलैला भंडीशेगाव, ४ जुलैला बाजीरावची विहीर येथे उभे आणि गोल रिंगण होईल. पालखी वाखरीत मुक्कामी असेल. तर, ५ जुलैला पालखी सोहळा पंढरीत पोहचणार आहे.



पंढरीत आषाढी एकादशीचा सोहळा ६ जुलैला संपन्न होईल. पालखी सोहळ्यात चांदोबाचा लिंब येथे पाहिले उभे रिंगण, पुरंदवडे येथे पहिले गोल रिंगण, खुडूस फाटा येथे दुसरे गोल रिंगण, ठाकुरबुवाची समाधी येथे तिसरे गोल रिंगण, वाखरीच्या बाजीराव विहीर येथे दुसरे उभे व चौथे गोल रिंगण, इसबावी पादुकांजवळ पंढरपूर प्रवेशापूर्वी तिसरे उभे रिंगण होईल. पाच दिवस पालखी पंढरीत मुक्कामी असणार आहे. त्यानंतर १० जुलैला पालखी परतीचा प्रवास सुरू करेल. ११ दिवसांचा पायी प्रवास करून पालखी सोहळा पुन्हा २० जुलैला आळंदीत दाखल होणार आहे.

# पुणे-नाशिक महामार्ग रुंदीकरणासाठी निधीची प्रतीक्षा

## प्रस्ताव तयार करून सहा वर्षे उलटली : जमीन अधिग्रहणाचे कामही रखडले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडसह उत्तर पुणे जिल्ह्याला नाशिकशी जोडणारा महत्त्वाचा पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग अनेक वर्षांपासून अपुरा, अरुंद आणि धोकादायक स्थितीत आहे. गेल्या काही वर्षांपासून या महामार्गाच्या रुंदीकरणाची मागणी सातत्याने होत असतानाही प्रत्यक्षात अद्याप निधीच मिळालेला नाही. परिणामी, हे रुंदीकरणाचे काम कागदावरच अडकून पडले आहे.



या महामार्गावर दररोज हजारो वाहनांची वर्दळ असते. औद्योगिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून या मार्गाचे अत्यंत महत्त्व असून, या मार्गावर अपघातांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. चिंचवड, आकुर्डी, निगडी, भोसरी, मोशी, चाकण, राजगुरूनगर, मंचर, आळेफाटा ते नाशिकपर्यंत मोठा औद्योगिक पट्टा आहे. याच मार्गावरून मालवाहतूकही मोठ्या प्रमाणावर होते. मात्र, दोन लेन असलेला हा महामार्ग पुरेसा न ठरल्यामुळे वाहतूक कोंडी व अपघाताचे प्रमाण वाढत चालले आहे.

२०१८ साली केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या महामार्गाच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव तयार केला होता. सध्या या रस्त्यावर अपुऱ्या रुंदीमुळे वाहने एकमेकांच्या अगदी जवळून जातात, त्यामुळे अनेक वेळा धक्के, अपघात आणि ट्रॅफिक जाम होत असते. अनेकवेळा अपघातांमुळे रस्ता तासन्तास बंद राहतो. या पार्श्वभूमीवर २०१८ साली तयार झालेला रुंदीकरणाचा प्रस्ताव हा भविष्यातील गरज लक्षात घेऊन तयार करण्यात आला होता. मात्र त्याच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारकडून अद्याप निधीची वाट पाहावी लागत आहे.

चार पदरी महामार्गासाठी जमिनीचे अधिग्रहण, पर्यावरणविषयक मंजुरी आदी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर राज्य आणि केंद्र सरकारदरम्यान अनेक बैठका होऊनही निधीच्या अभावामुळे प्रत्यक्ष कामाला सुरुवात होऊ शकलेली नाही. दरम्यान, महामार्गावरील स्थानिक आमदार, खासदार आणि नगरसेवकांनी वेळोवेळी पाठपुरावा करूनही शासनाकडून केवळ आश्वासनेच मिळत आहेत. चाकण आणि राजगुरुनगर परिसरात औद्योगिक वाढ मोठ्या प्रमाणावर झाली असून, वाहतूक प्रचंड वाढली आहे. रस्त्याची रुंदी अपुरी असल्यामुळे शालेय वाहने, खासगी वाहनधारक आणि मालवाहू ट्रक यांच्यातील चढाओढमुळे अपघातांना आमंत्रण मिळत आहे. महामार्ग रुंदीकरणाबाबत मंत्रालयात नुकत्याच झालेल्या बैठकीतही हा विषय चर्चेला आला होता. मात्र, त्यातही ठोस निधी मंजुरीचा निर्णय झाला नाही. या प्रकल्पासाठी सुमारे ८,००० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, त्यापैकी पहिल्या टप्प्यासाठी २,५०० कोटींच्या निधीची आवश्यकता आहे. मात्र, हा निधी वितरित झालेला नाही. त्यामुळे जमीन अधिग्रहणाचे कामही रखडले आहे. या महामार्गाच्या रुंदीकरणासोबतच प्रत्येक मोठ्या चौकात उड्डाणपूल, ट्रकसाठी वेगळा मार्ग, वेगमर्यादा नियंत्रणासाठी सीसीटीव्ही व्यवस्था आणि ट्रॅफिक डायव्हर्जन यासारख्या उपाययोजनाही प्रस्तावित आहेत. मात्र, निधी मिळेपर्यंत हे सर्व प्रस्ताव फक्त फाईलमध्येच आहेत. पिंपरी-चिंचवडमधील निगडी ते मोशी दरम्यान सध्या ठिकठिकाणी खड्डे आणि अरुंद रस्ता यामुळे वाहनचालकांचे हाल होत आहेत. पावसाळ्यात ही स्थिती अधिकच बिकट होते.

### पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागेना

**» या पार्श्वभूमीवर खासदार श्रीरंग बारणे यांनी नुकतेच केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन हा प्रश्न मांडला. स्थानिक आमदार अशोक पवार यांनीही विधानसभेत हा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांनी महामार्गाच्या कामाला तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली आहे. स्थानिक व्यापारी आणि उद्योजक संघटनांनीदेखील या विषयावर एकत्र येत निवेदनाद्वारे राज्य सरकारकडे मागणी केली आहे.**

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची अवैध होर्डींगवर कारवाई

## ड्रोनच्या सहाय्याने कीटकनाशकांची फवारणी सुरु : स्थानिक रोजगाराला मिळणार चालना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील अनधिकृत होर्डिंगवर पथकाच्या माध्यमातून कारवाई करण्यात येत आहे. हवेली तालुक्यात लोणी काळभोरमध्ये नुकतीच तीन ठिकाणी अनधिकृत होर्डिंग काढण्यात आले.



लोणी काळभोरमधील या कारवाईमुळे होर्डींगधारक, ॲडव्हरटायझिंग कंपनी यांनी धसका घेतला असून प्राधिकरणाच्या विकास परवानगीकडे अंतिम चलणे भरत आहे. यासह काही होर्डींग संबंधितांनी स्वत:हून काढून घेतले. अवकाळी पाऊस, वादळी वारे आदीमुळे अशा होर्डींगपासून धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधितांनी वर्दळीच्या व रहदारीच्या ठिकाणाचे धोकादायक, मर्यादेपेक्षा उंचीचे, दुबार संरचना होर्डिंग काढून घ्यावेत. तसेच होर्डींगधारकांनी अनधिकृत होर्डींगला परवानगी घेण्यात यावी, अन्यथा पीएमआरडीएच्या माध्यमातून एकतर्फी निष्कासन कारवाई करण्यात येईल. याची नोंद घ्यावी, असे आवाहन प्राधिकरणाच्या सह आयुक्त डॉ. दिप्ती सुर्यवंशी-पाटील यांनी केले आहे.

संबंधित कारवाई महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त महानगर आयुक्त दिपक सिंगला, पोलिस अधिक्षक तथा दक्षता अधिकारी अमोल तांबे, सह आयुक्त डॉ. दिप्ती सुर्यवंशी-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. कारवाईवेळी उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे, तहसीलदार रविंद्र रांजणे, तहसीलदार सचिन म्हस्के, पोलिस निरीक्षक महेशकुमार सरतापे, शाखा अभियंता विष्णू आवाड, शरद खोमणे, प्रणव डेंगळे, तेजस मदने यांच्यासह स्थानिक बंदोबस्त तैनात होता.

### अनधिकृत बांधकामांवर कारवाईचा बडगा

**» गेल्या काही दिवसापासून पीएमआरडीएच्या माध्यमातून अनधिकृत बांधकामांवर कारवाई सुरु आहे. यात बुधवारी वाघोलीतील (ता.हवेली) चालू बांधकामावर तसेच बावधनमधील (ता. मुळशी) बकाजी कॉर्नर ते स्मशान भूमीपर्यंत रस्त्याच्या दुर्तफा अतिक्रमणे काढण्यात आली. यात ३९ पत्राशेड, आरसीसी कट्टा, कंपाऊंड वॉल व टपरी आदी स्ट्रक्चर्स जमीनदोस्त करण्यात आली. यामुळे रस्त्यावरील वाहतुक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.**

# ‘एक गाव एक पोलीस’ योजना सुरू

## पुणे जिल्ह्यातील एक हजार 574 गावे : वाड्यावस्त्यांवर पोलीस पोहोचणार

**पुणे | प्रतिनिधी**

विविध गावांतील ग्रामस्थ आणि पोलिसांमध्ये संवाद वाढावा, तसेच गंभीर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पुणे ग्रामीण पोलिसांनी ‘एक गाव एक पोलीस’ योजना सुरू केली आहे. या योजनेला महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून सुरुवात करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून पुणे जिल्ह्यातील एक हजार ५७४ गावे, तसेच वाड्यावस्त्यांवर पोलीस पोहोचणार आहे.




पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांच्या संकल्पनेतून ही योजना सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील ३३ पोलीस ठाण्यांच्या अंतर्गत १५७४ गावे आहेत. गावाच्या परिसरात वाडी, वस्ती आहेत. या योजनेत १२९२ पोलीस पाटील, १५२४ पोलीस कर्मचारी सहभागी होणार आहेत. ‘सुरक्षित पुणे ग्रामीण’ या अ‍ॅपद्वारे पोलीस पाटील आणि पोलीस कर्मचाऱ्यांची नोंदणी करण्यात आली आहे, अशी माहिती ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

‘या अ‍ॅपच्या माध्यमातून गावांतील दैनंदिन घडामोडी, कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न, तसेच विविध भागांना भेट देण्यात येणार आहे. दैनंदिन गस्तही घालण्यात येणार आहे. ज्या भागांना भेटी दिल्या आहेत, तेथील छायाचित्रे अ‍ॅपवर टाकावी लागणार आहेत. त्या माध्यमातून गावांतील घडामोडींवर लक्ष ठेवता येणार आहे. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळण्यास मदत होणार आहे,’ असे त्यांनी नमूद केले.

### ‘सुरक्षित पुणे ग्रामीण पोलीस अ‍ॅप’

» ग्रामीण पोलिसांनी या योजनेअंतर्गत ‘सुरक्षित पुणे ग्रामीण पोलीस अ‍ॅप’ कार्यान्वित केले आहे. त्या माध्यमातून पोलीस पाटील आणि पोलीस कर्मचारी थेट संवाद साधू शकतील.

“ गावागावांतील वाड्यावस्त्यांपर्यंत ‘एक गाव एक पोलीस’ या योजनेच्या माध्यमातून पोलीस पोहोचणार आहेत. ग्रामस्थ आणि पोलिसांमध्ये संवाद (कम्युनिटी पोलिसिंग) वाढण्यास मदत होणार आहे. महिला आणि बालकांवरील अत्याचारांचे गुन्हे, तसेच गंभीर गुन्ह्यांची माहिती त्वरित मिळणार असून, त्या माध्यमातून प्रभावी कारवाई शक्य होणार आहे. या योजनेमुळे ग्रामस्थांमध्ये विश्वास निर्माण होणार आहे.

**- पंकज देशमुख, पोलीस अधीक्षक, ग्रामीण पोलीस.**

---

# तीव्र उन्हाळ्यामुळे जेजुरीतील खंडोबा गड सुनासुना

## भाविकांच्या संख्येत कमालीची घट : जेजुरीच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबा गडावर देवदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या संख्येत यंदाच्या तीव्र उन्हाळ्यामुळे कमालीची घट झाली आहे. जेजुरीच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम होऊ लागला आहे.



यंदा राज्यात तीव्र उन्हाळा असून, जेजुरी परिसरातील तापमानात वाढ झाली आहे. त्यामुळे सकाळी लवकर खंडोबा गडावर जाण्याकडे भाविकांचा कल आहे. दरवर्षी चैत्र आणि वैशाख महिन्यामध्ये खंडोबा गडावर देवदर्शनासाठी मोठी गर्दी असते. यंदा मात्र लग्नसराई असूनही चैत्र महिन्यात भाविकांची संख्या अत्यंत कमी होती. उन्हाच्या झळा तीव्र असल्याने खंडोबा गड चढताना भाविक घामाघूम होत आहेत. काहींना चक्कर येणे, दम लागणे असा त्रास होत आहे. श्री मार्तंड देवसंस्थानने भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये, यासाठी गडावर सावलीची व्यवस्था केली आहे. पिण्यासाठी पाण्याची सुविधा केली आहे. मात्र, तुलनेने भाविक कमी येत असल्याचे दिसून येत आहे.

कडेपठार डोंगरावर गर्दी कमी

जेजुरी गावापासून दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या कडेपठारच्या डोंगरात दररोज हजारो भाविक व पर्यटकांची गर्दी असते. पण यंदा कडक उन्हामुळे येथे गर्दी कमी जाणवत आहे. कडेपठारचे प्राचिन मंदिर उंच डोंगरावर निसर्गाच्या सानिध्यात असून डोंगर चढण्यासाठी एक तास वेळ लागतो. या ठिकाणी सुंदर वनराई आहे. भाविकांबरोबर पर्यटकही मोठ्या संख्येने येत असतात. वाढत्या तापमानाचा येथे येणारे भाविक आणि पर्यटकांवर परिणाम झाला असल्याचे कडेपठार लिंगदेवता ट्रस्टचे विश्वस्त म्हाळसाकांत जेजुरीकर यांनी सांगितले.

### बाजारपेठेत शुकशुकाट

» गर्दी कमी असल्याने बाजारपेठेत दुपारी शुकशुकाट असतो. सकाळी आणि सायंकाळी भंडार खोबऱ्याची विक्री काही प्रमाणात होत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. नेहमीपेक्षा यंदा निम्मीच गर्दी असल्याचे पुजाऱ्यांचे म्हणणे आहे. लॉज, पुजाऱ्यांची निवासस्थाने, धर्मशाळा येथे मुक्कामी येणाऱ्या भाविकांची संख्या अत्यंत कमी असल्याने खोल्या मोकळ्या रहात आहेत.

### चिंचेची बाग रिकामी

» होळकरांच्या ऐतिहासिक चिंच बागेमध्ये झाडाखाली दररोज शेकडो कुटुंबे कुलधर्म कुलाचारासाठी उतरतात. या ठिकाणी प्रामुख्याने चुली घालून भात, मटन, भाकरीचा नैवेद्य बानू देवीला दाखवण्यासाठी तयार केला जातो. बोकड, कोंबडा यांची विक्री मोठ्या प्रमाणात होते. जेवणासाठी आमंत्रित केलेले पाहुणे आवर्जून चिंच बनात येतात. परंतु यंदा कडक उन्हाळ्यामुळे पाहुण्यांनीही जेवणाकडे पाठ फिरवली आहे. कायम गजबजलेली चिंचेची बाग रिकामी असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.